# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

### प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/५९९/२०१६/३०

**(नोदंणी क्रमांक २०१६१०००२७)**

तक्रार दाखल दिनांक :- १७.१०.२०१६
निकाल दिनांक :- १५.१२.२०१६

श्री. झीशान अली सर्फराज अली सईद, तक्रारदार
सी टी एस नं. ४०१, सलीम कॉम्लेक्स, देवडी बाजार,
औरंगाबाद ४३१३१ सिटी चौक.
(ग्राहक क्रमांक ४९००१८४०६९९१)

**विरुध्द**

कार्यकारी अभियंता (प्रशासन), गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

**मंच**

१ ) डॉ.भास्कर पालवे अध्यक्ष
२ ) श्री. उत्तम.म.उरकुडे सदस्य / सचिव
३ ) श्री. वि. सु काबरा सदस्य

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. झीशान अली सर्फराज अली सईद हे गैरअर्जदार कार्यकारी अभियंता, नोडल अधिकारी, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे ग्राहक आहेत. अर्जदाराने महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ च्या अनुसूची -अ मध्ये गैरअर्जदार यांचेवर दिनांक १७-१०-२०१०६ रोजी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) माहे नोव्हेंबर २०१५ पासून रिडींग न घेता दिलेले वीज बील कमी करण्यात यावे व सुधारीत बील देण्यात यावे.

२) सहाय्यक अभियंता, महावितरण, सिटी चौक यांनी दिनांक ०६.०४.२०१६ आणि दिनांक २०.०८.२०१६ रोजी प्रत्यक्ष मिटर रिडींग घेऊन अहवाल सादर केला. तरी देखील वीज बिलात दुरुस्ती करण्यात आली नाही. म्हणुन मला नुकसान भरपाई देण्यात यावी.

३) महावितरणकडुन ग्राहकास विद्युत पूरवठा खंडीत करण्याची सारखी धमकी देण्यात आली. त्यामुळे ग्राहकाची समाजामध्ये मानहानी होत आहे व मानसिक छळ होत आहे.

४) महावितरणला ग्राहकाचा विद्युत पूरवठा खंडीत करु नये, असे निर्देश मंचाने द्यावेत.

५) ग्राहकास सहाय्यक अभियंता यांनी तयार केलेल्या दिनांक ०६.०४.२०१६ आणी २०.०८.२०१६ चा तपासणी अहवाल व्यक्तीशः स्वतः जाऊन आणावा लागला आणि महावितरणकडुन विद्युत पूरवठा खंडीत करण्याची धमकी यामुळे ग्राहकास मानसिक त्रास व छळ झाला त्याबद्दल नुकसान भरपाई म्हफन रुपये ५०००/- देण्यात यावेत.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.</u>**

अर्जदार श्री. झीशान अली सर्फराज अली सईद ग्राहक कमांक ४९००१८४०६९९१), सलिम कॉप्लेक्स, औरंगाबाद यांचे माहे जुलै २०१६ मध्ये वीज बिलाची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यानंतर सप्टेंर २०१६ मध्ये सदर ग्राहक डोअर लॉक असल्यामुळे ग्राहकास सरासरी वीज बील देण्यात आले आहे. माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये ग्राहकाच्या सरासरी वीज देयकाची वजावट देऊन अद्ययावत रिडींगचे सुध्दारीत वीज बिल देण्यात येईल, करीता अर्ज निकाली काढण्यात यावा.

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष</u>**

१) ग्राहकास सप्टेंबर २०१६ चे सरासरी बिल देण्यात आलेले आहे.

२) ग्राहकास अद्यापही सुधारीत वीज बिल देण्यात आलेले नाही.

३) ग्राहकास प्रत्यक्ष मिटर रिड्रींग प्रमाणे माहे नोव्हेंबर २०१५ पासून आज पर्यंत वीज बिल दुरुस्त करुन सुध्दारीत वीज बिल देणे आवश्यक आहे.

अर्जदार, गैरअर्जदार यांनी मांडलेले म्हणणे व मंचाचे निष्कर्ष यांचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१) महावितरणने ग्राहकाचे नोव्हेंबर २०१५ पासून प्रत्यक्ष रिड्रींगनुसार वीज बील दुरुस्त करुन सुधारीत वीज बील देण्यात यावे. ग्राहकाने भरलेले वीज बील त्यातुन वजा करावे.

२) ३० दिवसात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |